## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२९/०९/२०१६

**१) जमावाने अपघात ग्रस्त वाहनास जाळपोळ करुन नुकसान केले. :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी ११.४५वा. दरम्यान. यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करुन फिर्यादी हा अपघात ग्रस्त वाहनाची देखरेख करीत असतांना त्यास त्याचे कर्तव्यापासुन परावृत्त करुन अश्लिल शिविगाळ व मारपीट करुन अपघात ग्रस्त वाहनास जाळपोळ करुन नुकसान केल्याने व मा. कलेक्टर साहेब भंडारा यांचे कलम ३७(१)(३) म.पो.का चे जमावबंदी आदेशाची अवहेलना केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर पो.स्टे अडयाळ यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १४३,३४१,३५३,३३२,४३५,४२७ सहकलम १३५ मपोका भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शेख पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) पैशाचे वादावरुन लाकडी उभारीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी ०९.३० वा. दर. यातील आरोपीने पैशाचे वादावरुन फिर्यादी सोबत तोंडातोंडी भांडण करुन शिविगाळ करुन बंडीच्या लाकडी उभारीने डोक्यावर, डावे हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी व डॉ. रिपोर्ट यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादी विक्रम प्रतापसिंग परमार वय २४ वर्ष, गोडेगाव हा आपल्या मोटार सायकलने पालांदुरला जात असतांनी आरोपी हा आपल्या घरासमोर रोडचे बाजुला हातात काठी घेवुन उभा असतांना फिर्यादीस काही न विचारता डोळयात मिरची पावडर फेकुन आपल्या हातातील काठीने डोक्याचे मागील बाजुस, डाव्या खांदयावर, डाव्या हाताचे मनगटावर मारुन जखमी केले व पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८८ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९०१११७०६००

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.